वेळ : 2 तास | पूर्व परीक्षा (सराव पेपर) - 2 (2022-23) | एकूण गुण : 40

## (उत्तरे) पेपर - 2

**प्र 1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा :** **3**


1) महाबळेश्वरजवळील भिलार हे **पुस्तकांचे** गाव म्हणून प्रसिद्ध आहे.
2) चित्रकला आणि शिल्पकला यांचा **दृक्कला** मध्ये समावेश होतो.
3) महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार **संत तुकाराम** यांना मानतात.

**प्र 1. (ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा आणि लिहा :** **3**


1) चुकीची जोडी : सूर्य मंदिर – खजुराहो
2) चुकीची जोडी : भारतीय इतिहास आणि संस्कृती – अनियतकालिक : प्रसिद्धीचा काळ निश्चित नसतो
3) चुकीची जोडी : एकच प्याला – अण्णासाहेब किर्लोस्कर

**प्र 2. (अ) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : (कोणत्याही दोन)** **4**

1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :





2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :




वामन
परशुराम
राम
कृष्ण
बुद्ध
कल्की

3) पुढील तक्ता पूर्ण करा :

भारतीय विश्वकोश




**प्र. 2 (ब) थोडक्यात टिपा लिहा : (कोणत्याही दोन)** **4**

1) ॲनल्स प्रणाली

**उत्तर :** i) विसाव्या शतकाच्या सुरुवातीस फ्रान्समध्ये ॲनल्स नावाने ओळखली जाणारी इति हासलेखनाची प्रणाली उदयाला आली.

ii) ॲनल्स प्रणालीमुळे इति हासलेखनाला एक वेगळीच दिशा मिळाली. इतिहासाचा अभ्यास फक्त राजकीय घडामोडी, राजे, महान नेते आणि त्या अनुषंगाने राजकारण, मुत्सद्देगिरी, युद्धे यांच्यावर केंद्रित न करता तत्कालीन हवामान, स्थानिक लोक, शेती, व्यापार, तंत्रज्ञान, दळणवळण, संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांसारख्या विषयांचा अभ्यास करणेही महत्त्वाचे मानले जाऊ लागले.

iii) ॲनल्स प्रणाली सुरू करण्याचे आणि तिचा विकास करण्याचे श्रेय फ्रेंच इतिहासकारांना दिले जाते.

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

2) दूरदर्शन

**उत्तर :** i) दूरदर्शन हे दृक-श्राव्य माध्यम आहे.

ii) १५ सप्टेंबर १९५९ रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी 'दिल्ली दूरदर्शन केंद्रा'चे उद्घाटन केले.

iii) १५ ऑगस्ट १९८२ या दिवशी रंगीत दूरदर्शनचे आगमन झाले. १९९१ मध्ये परदेशी व देशी खासगी वाहिन्यांना केबल तंत्राच्या माध्यमातून कार्यक्रम प्रसारित करण्याची परवानगी दिली गेली.

iv) आजमितीला भारतीय प्रेक्षकांसाठी १000 हून अधिक वाहिन्या उपलब्ध आहेत.

3) मार्को पोलो

**उत्तर :** i) मार्को पोलो याचा जन्म इ. स. **1254** मध्ये इटलीतील व्हेनिस या शहरात एका व्यापारी कुटुंबात झाला.

ii) रेशीम मार्गावरून चीनपर्यंत प्रवास करणारा तो पहिला युरोपियन होय. तेराव्या शतकात त्याने चीनची ओळख युरोपला करून दिली.

iii) आशियातील निसर्ग, समाजजीवन, सांस्कृतिक जीवन आणि व्यापार यांची ओळख त्याने जगाला करून दिली. यातूनच युरोप व आशिया यांच्यात संवाद व व्यापार सुरू झाला.

iv) भारताच्या दक्षिणेला किनारपट्टीतूनही त्याने प्रवास केला आणि तेथील लोकजीवन यांचे वर्णनही त्याने आपल्या पुस्तकात केले आहे.

**प्र . 3 पुढील विधानांची सकारण स्पष्टीकरण करा : (कोणतीही दोन) :** **4**

1) राजतरंगिणी आधुनिक इतिहासलेखनाच्या संकल्पनेच्या अगदी जवळ आहे.

**उत्तर :** i) इसवी सनाच्या १२ व्या शतकात कल्हण याने हा ग्रंथ लिहिला.

ii) 'राजतरंगिणी' हा काश्मीरच्या इतिहासावरील ग्रंथ आहे.

iii) इतिहासलेखन शास्त्र शुद्ध कसे असावे, याच्या आधुनिक संकल्पनेशी हा ग्रंथ जवळचे नाते सांगतो.

iv) त्यामध्ये अनेक कोरीव लेख, नाणी, प्राचीन वास्तूंचे अवशेष, राजकुलांच्या अधिकृत नोंदी आणि स्थानिक परंपरा अशा अनेक साधनांचा चिकित्सक अभ्यास करून आपण हा ग्रंथ रचला, असा उल्लेख कल्हणाने केला आहे.

2) चित्र कथीसारख्या नामशेष होणाऱ्या मार्गावर असलेल्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.

**उत्तर :** i) कठपुतळ्या किंवा चित्रांच्या साहाय्याने रामायण, महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा म्हणजे चित्र कथी परंपरा. ती कोकणातील कुडाळजवळच्या पिंगुळी गावातल्या ठाकर या आदिवासी समाजाच्या लोकांनी जपली आहे.

ii) या परंपरेतील चित्रे कागदावर काढून नैसर्गिक रंगात रंगवलेली असतात. एका कथेसाठी साधारणपणे ३० ते ५० चित्रांचा वापर केला जातो.

iii) वेगवेगळ्या कथा सांगण्यासाठी अशा चित्रांच्या पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या पोथ्या चित्र कथी कुटुंबांमध्ये जपलेल्या असतात.

iv) नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सरकार आणि कलाकारांतर्फे केले जात आहेत.

3) प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

**उत्तर :** i) प्रत्येक वेळी वर्तमानपत्रांमधून आपणांसमोर येणारी माहिती वास्तवाला धरून असेलच असे नाही. आपणांस ती तपासून घ्यावी लागते.

ii) अनधिकृत बातमी प्रसिद्धहोण्याचे एक जगप्रसिद्ध उदाहरण आहे. 'स्टर्न ' नावाच्या एका जर्मन साप्ताहिकाने ॲडॉल्फ हिटलरच्या हस्ताक्षरातील अनेक रोजनिशी विकत घेतल्या आणि त्या इतर प्रकाशक कंपन्यांना विकल्या. हिटलरच्या या तथाकथित हस्तलिखित रोजनिशी मिळाल्याची बातमी प्रसिद्ध झाली. परंतु त्या रोजनिशा नकली असल्याचे सिद्ध झाले. म्हणून प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

Genius JEE NEET CET FOUNDATION Institute

4) खेळणी आणि परंपरा एखादया ठिकाणाचा सांस्कृतिक इतिहास दर्शवतात.

**उत्तर :** i) खेळणी एखादया ठिकाणाचा इतिहास ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा यावर लक्ष केंद्रित करतात.

ii) सण आपल्याला धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांची झलक पाहण्याची संधी देतात.

iii) खेळण्यांमधून इतिहास आणि तंत्रज्ञानाची प्रगती यांवर प्रकाश पडतो, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा समजतात.

iv) महाराष्ट्रात दिवाळीत किल्ले करण्याची मोठी परंपरा आहे. या मातीच्या किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रतिमा ठेवतात. महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या साहाय्याने घडलेल्या इतिहासाला उजाळा देण्याचाच हा एक प्रकार आहे. म्हणून खेळणी आणि परंपरा एखादया ठिकाणाचा सांस्कृतिक इतिहास दर्शवतात.

**प्र. 4 दिलेल्या उता-याचे काळजीपूर्वक वाचन करून, त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 4**

1) जगातील सर्वात जुने संग्रालय कोठे सापडले?

**उत्तर :** जगातील सर्वात जुने संग्रालय मेसोपोटेमियातील 'उर' या प्राचीन शहराचे उत्खनन करताना सापडले.

2) हे संग्रालय कोणी बांधले?

**उत्तर :** हे संग्रहालय एनिगॉल्डी नावाच्या मेसोपोटेमियाच्या राजकन्येने बांधले होते.

3) 'उर' येथील संग्रालयाचे वैशिटय लिहा?

**उत्तर :** संग्रालयाचे वैशिटय म्हणजे, या संग्रहालयात सापडलेल्या प्राचीन वस्तू सोबत त्या वस्तूंचे सविस्तर वर्णन करणाऱ्या मातीच्या वटिका (clay tablets) होत्या.

**प्र. 5 पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतीही दोन)** **6**

1) खालील चित्राचे निरिक्षण करून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

a) चित्रकला परंपरेचे नाव लिहा.

**उत्तर :** या चित्रातून वारली समाजजीवन व्यक्त होते.

b) निसर्गाचे चित्रण स्पष्ट करा.

**उत्तर :** i) वारली चित्रे निसर्गाच्या जवळ आहेत आणि भौमितीक आकारांद्वारे चित्र रेखाटली आहेत.

ii) काही वनस्पतींच्या फांदया, फुलझाडे, उगवता सूर्य, पक्षी यांची चित्र रेखाटली आहेत.

iii) वर्तुळ सूर्य आणि चंद्राचे प्रतिनिधत्व करते, तर त्रिकोण पर्वताचे प्रतिनिधित्व करते.

c) रेखाटनाची वैशिष्टये स्पष्ट करा.

**उत्तर :** i) वारली चित्रे ही कुडांच्या भिंतींवर रेखाटली जातात.

ii) दैनंदिन जीवनातील दृश्ये दर्शवणारी मानव आणि प्राणी यांची चित्रे लयबद्ध पद्धतीने तयार केली जातात.

2) लिओपॉल्ड व्हॉन रांके यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा

**उत्तर :** i) लिओपॉल्ड व्हॉन रांके याने इतिहास संशोधनाची चिकित्सक पद्धती कशी असावी ते सांगितले.

ii) मूळ दस्तऐवजांच्या आधारे प्राप्त झालेली माहिती ही सर्वाधिक महत्त्वाची आहे, यावर त्याने भर दिला.

iii) तसेच ऐतिहासिक घटनांशी संबंधित असलेल्या सर्व प्रकारची कागदपत्रे आणि दस्तऐवज यांचा कसून शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्याने सांगितले.

iv) अशा पद्धतीने ऐतिहासिक सत्यापर्यंत पोचता येणे शक्य आहे, असा विश्वास त्याने व्यक्त केला.

v) इतिहासलेखनातील काल्पनिकतेवर त्याने टीका केली. त्याने जागतिक इतिहासाच्या मांडणीवर भर दिला.

vi) 'द थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी' आणि 'द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या ग्रंथांमध्ये त्याच्या विविध लेखांचे संकलन आहे.

Genius JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

3) खेळ आणि इतिहास यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

i) मनोरंजन व शारीरिक व्यायाम यांसाठी केली जाणारी कोणतीही कृती म्हणजे खेळ.

ii) मानवाच्या प्रारंभीच्या काळात विविध प्रकारचे खेळ खेळले जात.

iii) शिकार हा जसा उदरनिर्वाहाचा मार्ग होता तसाच तो खेळ व मनोरंजनाचाही एक भाग होता.

iv) भारतातील प्राचीन साहित्यात आणि महाकाव्यांमधून द्यूत, कुस्ती, रथांच्या आणि घोड्यांच्या शर्यती आणि बुद्धिबळ यांचे उल्लेख येतात.

v) कोशांतर्गत वा वर्तमानपत्रे किंवा अन्य ठिकाणी 'क्रीडा' या विषयावर लिहिताना खेळांचा इतिहास माहीत असणे आवश्यक असते.

vi) ऑलिंपिक किंवा एशियाड सामने किंवा कोणत्याही स्वरूपाची राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या संदर्भातील लेखन, समीक्षा करण्यासाठी इतिहासाच्या जाणकारांची मदत घ्यावी लागते.

vii) खेळ आणि इतिहास विषय म्हणून जरी दूर असल्याचे दिसत असले तरी त्यांच्यात परस्परसंबंध आहे.

4) अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्त्वाची आहेत?

**उत्तर :** अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात पुढील कामे महत्त्वाची असतात.

i) महत्त्वाच्या नोंदी असलेली कागदपत्रे त्यांमध्ये कोणताही बदल न करता सुरक्षित ठेवणे.

ii) त्यांच्या सूची तयार करणे आणि ती हवी तेव्हा उपलब्ध करून देणे.

iii) जुन्या दस्ताऐवजांचे वाळवी दमट हवा इत्यादींपासून संरक्षण करणे.

iv) संगणकीय प्रणालीचा वापर करणे.
v) देशाचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवणे.
vi) अभिलेख व्यवस्थापनाविषयी सुधारित कार्यपद्धती अमलात आणणे.
vii) महत्त्वाच्या कागदपत्रांची गोपनीयता जपणे.

## राज्यशास्त्र

**प्र. 6 दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा :** **2**

1) **माहितीचा अधिकार** शासनाची पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करते.
2) जगातील सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान म्हणजे **लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे**.

**प्र. 7 पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतीही दोन)** **4**

1) भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.

**उत्तर :** वरील विधान बरोबर आहे.

i) भारतीय संविधानाने पूर्वीची मतदानाच्या अटी रद्द केल्याने मतदाराच्या संख्येत प्रचंड वाढ झाली.
ii) संविधानाने सर्व प्रौढ स्त्री-पुरूषांना मतदानाचा अधिकार दिला आहे.
iii) स्वतंत्र भारतात प्रत्येक भारतीय स्त्री -पुरुषाला २१ वर्षे वयाची अट निश्चित करून मतदानाचा अधिकार संविधानाने दिला होता. तो आणखी व्यापक करत मतदाराचे वय २१ वरून १८ वर्षे इथपर्यंत आणले.
iv) इतकी मतदारसंख्या अन्य कोणत्याच लोकशाही असलेल्या देशात आढळत नाही. म्हणून भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

2) राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

**उत्तर :** हे विधान बरोबर आहे; कारण-

i) जनतेच्या मागण्या आणि गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहचवण्याचे कार्य राजकीय पक्ष करतात.
ii) शासन पक्षां मार्फत आपल्या धोरण–कार्य क्रमांना पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करते.

3) डाव्या उग्रवादी चळवळीत आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व वाढत आहे.

**उत्तर :** वरील विधान चूक आहे.

i) भूमिहीन शेतकरी, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला दूर करण्यासाठी नक्षलवाद सुरू झाला.
ii) या नक्षलवादाने आता उग्र रूप धारण केले आहे.
iii) पण यातील शेतकरी–आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व कमी होऊन सरकारला हिंसक पद्धतीने विरोध करणे, पोलीसदलांवर हल्ले करणे, यांसारख्या मार्गांचा वापर नक्षलवादी गटांकडून केला जातो.

**प्र. 8 (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतीही एक)** **2**

1) मतदारसंघाची पुनर्रचना

**उत्तर :** i) लोकसभेतील एकूण सदस्यसंख्या ५४३ आहे.
ii) प्रत्येक सभासद एका मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतो. म्हणजेच लोकसभेचे ५४३ मतदार संघ आहेत.
iii) हे मतदारसंघ निर्माण करण्याचे काम निवडणूक आयोगाच्या परिसीमन समितीचे असते.
iv) कोणत्याही दबावाखाली न येता ही यंत्रणा तटस्थपणे मतदारसंघाची पुनर्रचना करते.

2) आदिवासी चळवळ

**उत्तर :** i) स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी आदिवासींच्या जंगल संपत्ती वर उदरनिर्वाह करण्याच्या हक्कावर गदा आणली. तेव्हापासून आदिवासींचा संघर्ष चालू आहे.

ii) भारतातील आदिवासींचे अनेक प्रश्न आहेत. त्यांतील प्रमुख प्रश्न म्हणजे त्यांचा वनावरील अधिकार नाकारला जातो.

iii) आदिवासी चळवळीची प्रमुख मागणी म्हणजे आदिवासींचे वनावरील अधिकार मान्य करावेत, वनातील उत्पादने गोळा करण्याचा आणि वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार त्यांना मिळावा.


iv) या चळवळीची सुरूवात महाराष्ट्र, ओडिसा व भारतातील इतर भागांतून झाली.

**प्र. 8 (ब) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा : (कोणतेही एक)** **2**

1) पुढील तक्ता पूर्ण करा

| कमांक. | वर्ष | घटना |
|---|---|---|
| 1. | 1950 | **भारताचे संविधान लागू झाले** |
| 2. | **1992** | भारतीय संविधानातील **73** वी आणि **74** वी दुरूस्ती |
| 3. | 2005 | **माहितीचा अधिकार** |
| 4. | **2014** | जास्तीत जास्त महिला खासदार निवडून आल्या |

2) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा



Genius JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

**प्र. 9 पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : (कोणताही एक)** **2**

1) निवडणूक आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

**उत्तर :** निवडणूक आयोगाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत

i) मतदार याद्या तयार करणे

ii) निवडणुकांचे वेळापत्रक व संपूर्ण कार्यक्रम ठरवणे

iii) उमेदवारांच्या अर्जांची छाननी

iv) राजकीय पक्षांना मान्यता देणे

v) निवडणुकीसंबंधी वाद सोडवणे

2) भारतातील पक्षपद्धतीच्या स्वरूपात काय बदल झाला आहे?

**उत्तर :** i) स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस हा एक प्रबळ पक्ष होता. काही अपवाद वगळता केंद्र व राज्य पातळीवर या पक्षाला

बहुमत होते.

ii) एक प्रबळ पक्ष पद्धतीला १९७७ मध्ये आव्हान दिले गेले. हे आव्हान काँग्रेसेतर पक्षांनी एकत्र येऊन दिले.

iii) १९८९ च्या लोकसभा निवडणुकांनंतर राजकारणात एकाच पक्षाचे वर्चस्व असणे ही बाब संपुष्टात आली. त्यानंतरच्या काळात अनेक पक्षांनी एकत्र येऊन आघाडीचे शासन स्थापन करण्यास सुरुवात केली.

iv) आघाडीचे शासन ही बाब आता भारताच्या राजकीय व्यवस्थेत स्थिरावली आहे.

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute